<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ उदय त्रिविक्रम पाल यांची साक्ष</u>

<u>अधिकचा सरतपास वादीतर्फे विधिज्ञा श्रीम. एम.जी.बांदेकर यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>

१२. मला निशाणी क्र.४/२ दिनांक १६.०३.२०१६ रोजीचा प्रतिवादी क्र.१ यांनी वादी बँकेकडे मागणी केलेल्या कर्जाच्या अर्जाची मूळ प्रत दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर प्रतिवादी क्र.१ ची सही आहे तसेच आमचे बँकचे व्यवस्थापक सत्यविजय विद्यालंकार यांची सही आहे. त्यास **निशाणी क्र.४०** देण्यात येते.

१३. मला निशाणी क्र.४/३ वर दाखल असलेले दिनांक २३.०३.२०१६ रोजीचे प्रतिवादी क्र.१ ने दिलेल्या वादी बँकेने त्यास मंजूर केलेल्या कर्ज मंजूरीच्या पत्राची सहिसुद नक्कल दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर आमचे बँकचे व्यवस्थापक सत्यविजय विद्यालंकार यांची सही आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या सहया आहेत. त्यास **निशाणी क्र.४१** देण्यात येते.

१४. मला निशाणी क्र.४/४ वर दाखल असलेले दिनांक २३.०३.२०१६ रोजीचे वादी बँकेने प्रतिवादी क्र.१ ला दिलेले इन्स्टॉलमेंट पत्राची मुळ प्रत दाखविण्यात आली. प्रतिवादी क्र.१ ला एकूण ७२ इन्स्टॉलमेंट परमहा ११,६२४ प्रमाणे देण्यात आले. त्यावर बँक व्यवस्थापक यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४२** देण्यात येते.

१५. मला निशाणी क्र.४/५ वर दाखल असलेले दिनांक २३.०३.२०१६ रोजीचे वादी बँकेला प्रतिवादी क्र.१ ने लिहून दिलेला डिमांड प्रॉमिसरी नोटची मूळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर प्रतिवादी क्र.१ ची सही आहे. त्यास **निशाणी क्र.४३** देण्यात येते.

१६. मला निशाणी क्र.४/६ वर दाखल असलेले दिनांक २३.०१.२०१९ रोजीचे वादी बँकेला प्रतिवादी क्र.१ ने लिहून दिलेला ॲक्नॉलेजमंटकम एक्सटेशन पत्राची मूळ प्रत

दाखविण्यात आली. त्यावर प्रतिवादी क्र.१ ची सही आहे. तसेच बँक व्यवस्थापक यांची सही असून बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४४** देण्यात येते.

१७. मला निशाणी क्र.४/७ वर दाखल असलेले दिनांक २३.०३.२०१६ रोजीचे वादी बँकेला प्रतिवादी क्र.१ ने लिहून दिलेले कम्पोजिट पत्राची (एल/५१६) ची मूळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर प्रतिवादी क्र.१ ची सही आहे. तसेच बँक व्यवस्थापक यांची सही असून बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४५** देण्यात येते.

१८. मला निशाणी क्र.४/८ वर दाखल असलेले दिनांक २३.०३.२०१६ रोजीचे वादी बँकेकडील हायपोथिकेशन-कम-लोन कराराची मूळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर प्रतिवादी क्र.१ ची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४६** देण्यात येते.

१९. मला निशाणी क्र.४/९ वर दाखल असलेले दिनांक २३.०३.२०१६ रोजीचे प्रतिवादी यांनी वादी बँकेला लिहून दिलेले ॲक्नॉलेजमेंट-कम ड्ाफट डिक्लेरेशन लेटरची मूळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर प्रतिवादी क्र.१ ची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४७** देण्यात येते.

२०. मला निशाणी क्र.४/१० वर दाखल असलेले दिनांक २३.०३.२०१६ रोजीचे वादी बँकेला प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी लिहून दिलेले गॅरंटी डिडची मूळप्रत दाखविण्यात आली. त्यावर प्रतिवादी क्र.२ व ३ च्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४८** देण्यात येते.

२१. मला निशाणी क्र.४/११ वर दाखल असलेले दिनांक २३.०३.२०१६ रोजीचे वादी बँकेकडील प्रतिवादी क्र.१ च्या अकाऊंट स्टेटमेंटची मूळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर बँकेचा शिक्का व व्यवस्थापक यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४९** देण्यात येते.

२२. मला निशाणी क्र.३२/१ वर दाखल असलेले दिनांक ०६.०३.२०२४ रोजीचा प्रमाणपत्र दाखविण्यात आले. सदर प्रमाणपत्र हे बँकेचे व्यवस्थापक यांदी दिलेले असून त्यावर त्यांची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५०** देण्यात येते.

२३. मला निशाणी क्र.३२/२ वर दाखल असलेले दिनांक ०६.०३.२०२४ रोजीचे भारतीय पुरावा कायदा कलम ६५बी प्रमाणपत्र दाखविण्यात आले. सदर प्रमाणपत्र हे बँकेचे व्यवस्थापक यांदी दिलेले असून त्यावर त्यांची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५१** देण्यात येते.

२४. मला निशाणी क्र.३२/३ वर दाखल असलेले दिनांक ०६.०३.२०२४ रोजीचे बँकर्स बुक इव्हीडंस ॲक्ट कलम २अ प्रमाणे दिलेले प्रमाणपत्र दाखविण्यात आले. सदर प्रमाणपत्र हे बँकेचे व्यवस्थापक यांदी दिलेले असून त्यावर त्यांची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५२** देण्यात येते.

२५. मला दिनांक ०८.०९.२०२३ रोजीचे अधिकारपत्राची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदर अधिकारपत्र वादी बँकेतर्फे झोनल अधिकारी संतोष ब. सावंतदेसाई यांनी मला दिलेले असून त्यावर त्यांची सही आहे. तसेच बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर दस्त हा निशाणी क्र.२७ ला दाखल आहे.

सरतपास पूर्ण.

उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही /-
एम.के.फकीह
दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.

दि. ३०/०४/२०२६